दिनांक : 28/11/18

महानिर्मिती

# अधिसुचना

**विषय** : "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाच्या गुणांच्या सुधारीत यादीबाबत.

**संदर्भ** : १. महानिर्मिती जाहिरात क्र. ०१(जाने)/२०१७

२. मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल याचिका क्र.४००३/२०१७

---

उपरोक्त विषयास अनुसरुन महानिर्मिती जाहिरात क्र. ०१(जाने)/२०१७ अन्वये "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) पदे सरळसेवेने भरणेबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदरील जाहिरातीच्या अनुषंगाने ऑनलाईन परीक्षा व वैयक्तिक मुलाखतीत प्राप्त गुणांनुसार तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादी दि.१९.०७.२०१७ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती.

तथापि, मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्र. ४००३/२०१७ प्रकरणी दिलेल्या आदेशानुसार आणि मा. सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या मान्यतेनुसार उपरोक्त तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादी सुधारीत करणे आवश्यक होते. त्यानुसार यापूर्वी दि. १९.०७.२०१७ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादी रद्द करण्यात येत आहे. तसेच ऑनलाईन परीक्षेतील प्राप्त गुणांची सुधारीत यादी सोबत जोडली असून ती प्राप्त करुन घेण्यासाठी खालील ठिकाणी क्लिक करावे.

**रसायनशास्त्रज्ञ (Chemist) या पदाच्या ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुणांची सुधारीत यादी.**

यापूर्वी ज्या उमेदवारांची वैयक्तिक मुलाखत परीक्षा आणि कागदपत्र पडताळणी पार पाडण्यात आलेली आहे, अशा उमेदवारांना पुन:च्छ सदरील प्रक्रियेकरीता बोलवण्यात येणार नाही. तथापि, सुधारित ऑनलाईन गुणांच्या यादीनुसार जे उमेदवार वैयक्तिक मुलाखतीस आणि कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र ठरत आहेत, अशा उमेदवारांनी उपरोक्त प्रक्रियेत उपस्थित रहाणे आवश्यक आहे. त्यासाठीची स्वतंत्र अधिसूचना प्रसारित करण्यात येईल.

यापूर्वी ऑनलाईन परीक्षेतील व वैयक्तिक मुलाखतीतील प्राप्त गुणांनुसार आणि कागदपत्रे पडताळणीअंती पात्र ठरलेल्या उमेदवारांची निवड यादी सरळसेवे संदर्भातील सर्व प्रक्रिया पार पाडल्यानंतर प्रसिद्ध करण्यात येईल, याची कृपया सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**टिप**:- प्रश्नपत्रिकेतील नमूद ०१ प्रश्न बाद ठरविण्यात आलेला असल्याने सुधारित एकूण गुण १७८ पैकी दर्शविण्यात आलेले आहेत, याची कृपया सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती